महत्वाचे

जा.क्र.उमाशि-२/सह.सभा/पुवि/२०१४/२००२९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : ३०/८/२०१४

30 AUG 2014

प्रति,

**अध्यक्ष / सचिव**
**पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन**
**शिक्षक संघटना, पुणे.**

**विषय :- पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना यांचे समवेत शै. वर्ष २०१४-१५ मधील प्रथम सहविचार सभा.**

**संदर्भ :- १) संघटनेचे अध्यक्ष यांनी दिनांक ४/८/२०१४ रोजी दिलेले पत्र**
**२) मा. शिक्षण संचालक, (प्राथमिक /माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे परिपत्रक क्रमांक प्राशिसं/संकीर्ण/२०१२/ड-५१६/८०२४ दिनांक २६/१२/२०१२**
**३) या कार्यालयाकडील पत्र समक्रमांक १९३२७ दिनांक १६/८/२०१४**
**४) या कार्यालयाकडील पत्र समक्रमांक १९८०८ दिनांक २२/८/२०१४**

शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता शिबिर दिनांक २५/८/२०१४ ते १८/१०/२०१४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले होते. **दिनांक ५ सप्टेंबर २०१४ रोजी राज्य शिक्षक पुरस्कार समारंभ होणार असून त्याचे संपूर्ण नियोजनाची जबाबदारी हया वर्षी पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे-१ या कार्यालयाकडे देण्यात आलेली आहे.** त्यामुळे दिनांक २५/०८/२०१४ ते ०६/०९/२०१४ या कालावधीतील सोलापूर जिल्हयाचे शिबीर तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात येत असून दिनांक १०/०९/२०१४ पासून होणारे पुढील शिबीर नियोजित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे होईल.

आपल्या दिनांक ४/८/२०१४ च्या विषयपत्रिकेनुसार पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना पदाधिकारी यांचेसमवेत शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील प्रथम सहविचार सभा दिनांक २५/०८/२०१४ व नंतर दिनांक २/९/२०१४ रोजी आयोजित करण्यात आलेली सहविचार सभा रद्द करण्यात येवून सदर सभा त्याऐवजी **दिनांक १०/९/२०१४ रोजी पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर येथे सकाळी १२.३० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी सदर बदलाची नोंद घेण्यात यावी.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ करिता

प्रत - **शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, पुणे सोलापूर अहमदनगर**

**अधिक्षक,**
**वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,**
**पुणे / सोलापूर / अहमदनगर**

**लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक, (शिक्षण खाते)**
**पुणे / सोलापूर / अहमदनगर**
२/- आपल्या संबंधीत जिल्हयाशी निगडीत असलेली माहितीस्तव वेळेवर बैठकीस उपस्थित रहावे. प्रतिनिधी पाठवू नये.

प्रत - **प्राचार्य, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर**
२/- यांनी दिनांक १०/९/२०१४ रोजी आयोजित केलेल्या सहविचार सभेची बैठक व्यवस्था व नियोजन करावे.